# ३७० कलम केंद्र सरकारची भूमिका

**डॉ. अनिल रा. कडू,** राज्यशास्त्र विभाग प्रमुख, स्व. पुंचफुलाबाई पावडे महिला महाविद्यालय, वरुड

- **प्रस्तावना :—**

जम्मू आणि काश्मीर पुर्नरचना विधेयकाला भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी मंजूरी दिली आणि जम्मु आणि काश्मिर पुर्नरचना कायदा २०१९ या नावाने ओळखला जाऊ लागला. त्याची अंमलबजावणी ९ ऑगस्ट पासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात व भारताचे गृहमंत्री अमित शहा यांच्या अथक प्रयत्नाने होत आहे. मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या राजपत्रामध्ये जम्मू आणि काश्मीर घटनेतील ३७० व्या कलमानुसार विशेष दर्जा देण्यात आला होता. आता मात्र हा दर्जा मागे घेण्यात आला आहे असे राज्यसभेमध्ये अमित शहा यांनी निवेदन करुन बहुमताने ठराव पास केला. नंतर लोकसभेमध्ये एकमताने ठराव पास करुन काश्मिर राज्याचे केंद्रशासित बनविण्याचा निर्णय संसदेमध्ये एकमताने घेण्यात आला. जम्मू आणि काश्मीर मध्ये विधानसभ असेल मात्र लद्दाख मध्ये विधानसभा नसेल.

- **कलम ३७० मधील महत्वाच्या तरतुदी :—**

३७० या कलमानुसार सुरक्षा, परराष्ट्र धोरण, अर्थ, दळणवण या बाबी सोडल्या तर कोणत्याही कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी जम्मू आणि काश्मीरच्या विधानसभेची संमती लागत होती. त्यामुळे तिथल्या रहिवास्यांसाठी नागरिकत्व, मालमत्तेची मालकी, मुलभूत हक्क या विषयाच्या तरतुदी वेगळयाच आहेत. जम्मू आणि काश्मीर वगळता भारतातल्या इतर कोणत्याही राज्यातील लोक येथे मालमत्ता विकत घेऊ शकत नाही. कलम ३७० नुसार जम्मू आणि काश्मीर मध्ये आर्थिक आणिबाणी लादू शकत नाही. विधानसभेच्या संमतीनंतरच तेथे केंद्रसरकारला आणिबाणी लागू करता येते. तसेच सर्वोच्च कायदे करण्याचा अधिकार संसदेला असतांना मात्र जम्मू आणि काश्मीर मध्ये अधिकार विधानसभेकडे सुरक्षित होते. प्रतिबंधात्मक स्थानबध्दतेचे अंशत: पसरते आहे असे लक्षात आल्यास काही संशयीतांना किंवा समाजकंटकांना अटक करण्यात येते, त्याला प्रतिबंधात्मक स्थानबध्दता असे म्हणतात. नियम करण्याचे अधिकार जम्मू आणि काश्मीरच्या विधाानसभेकडे होते, त्यामुळे भारतात इतर भागात असलेले नियम येथे लागू होत नव्हते. राज्यघटनेची मार्गदर्शक तत्वे आणि मुलभूत कर्तव्य जम्मू आणि काश्मीरमध्ये लागू नव्हते. विधानसभेने मान्यता दिली तरच कायदे रद्द होऊ शकत होते, आता माहा सर्वोच्च संसद आहे.

- **कलम ३७० चा इतिहास :—**

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३७० नुसार जम्मू आणि काश्मीरला सार्वभौम राज्य म्हणून विशेष दर्जा देण्यात आला होता. १९४७ मध्ये भारताच्या फाळणीनंतर जम्मू आणि काश्मीरचे राजा हरिसींह यांना स्वतंत्र राहण्याची इच्छा होती. नंतर त्यांनी भारतात विलीनीकरणासाठी मंजूरी दिली. जम्मू आणि काश्मीरमध्ये पहिले हंगामी सरकार स्थापन केल्यावर नॅशनल कॉन्फरन्सचे नेते शेख अब्दुल्ला यांनी भारतीय संविधानाच्या कक्षेच्या बाहेर राहण्याची शिफारस केली. भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा या कलमाला विरोध होता. डॉ. पी. जी. ज्योतीकर त्यांच्या Visionary Dr. Babasaheb Ambedkar या पुस्तकात त्यांनी केलेल्या विरोधाचा उल्लेख आहे. ते म्हणतात — काश्मिरला विशेष दर्जा देण्याची मागणी शेख अब्दुला यांनी केली होती, मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याला स्पष्टपणे नकार दिला आणि ठणकावून सांगीतले की, शेख अब्दुला तुमचे म्हणणे आहे की, भारताने तुमचे रक्षण करावे, रस्ते बांधावे, लोकांना धान्य द्यावे, मात्र भारताला काहीही अधिकार राहणार नाही हेच तुम्हाला म्हणायचे आहे काय? अशी मागणी मी कधीच मान्य करु शकत नाही. त्यानंतर या कलमाचा मसुदा तयार करण्याची जबाबदारी पंडित जवाहरलाल नेहरुनी गोपालस्वामी अय्यांगार यांच्यावर सोपविली. सन १९५१ मध्ये राज्याला एक वेगळी घटना समिती स्थापन करण्याची परवानगी दिली. नोव्हेंबर १९५६ मध्ये ही घटना तयार करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली काश्मिरला सुरुवातीला असलेला दर्जा तात्पुरत्या स्वरुपाचा होता, मात्र ८ ऑगस्ट पर्यंत हा दर्जा कायम होता. मात्र मोदी आणि अमित शहा या जोडीने मेहबुबी मुफ्ती यांच्या सरकारमधील पाठींबा काढून ३५६ चा वापर करुन राज्यपालाचे सूत्र स्वीकारुन ३७० हटविण्याचा संविधानिक निर्धारच केला होता.

- **कलम ३५ अ आणि ३७० कलम :—**

जम्मू आणि काश्मीरमध्ये केंद्र सरकारने ३८ हजार अतिरिक्त सुरक्षा सैनिक पाठविल्याने चांगल्याच हालचाली सुरु झाल्याने तसेच पर्यटकांना काश्मीर सोडण्याचे आवाहन केल्याने काश्मीर मधील राजकारण ढवळून निघाले होते. १७ व्या लोकसभा निवडणूकीत भाजपाच्या जाहीरानाम्यात ३७० कलम रद्द करण्यात येईल असे जाहीरनाम्यात असल्याने सरकार हा निर्णय घेईल याची चाहूल सर्वांनाच लागली होती.

तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु व शेख अब्दुल यांची दिल्लीमध्ये सन १९५२ मध्ये झालेल्या करारानुसार राज्यघटनेतील काही तरतुदी राष्ट्रपतींच्या आदेशान १९५४ मध्ये करण्यात आला. त्यावेळी कलम ३५अ राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आली. १९५६ मध्ये संविधानिक तरतुद करण्यात आली होती. त्यामध्ये महाराणा हरिसिंह यांच्या काळातील कायमस्वरुपी नागरिकांची व्याख्या रद्द करण्यात आली. त्यानुसार १९११ पूर्वी राज्यात जन्मलेले किंवा स्थायिक झालेले सर्व नागरिक किंवा संबंधीत तारखेपूर्वी १० वर्षाहून अधिक काळ कायदेशीर मार्गाने स्थावर मालमत्ता धारण केलेले नागरिक यांचा समावेश होता.

- **कलम ३७० मधील प्रमुख मुद्दे :—**

१. कलम ३७० लागू झाल्यामुळे जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा प्राप्त झाला होता.

२. कलम ३७० मधील तरतूदी अंतर्गत संसदंला जम्मू आणि काश्मीरसाठी फक्त संरक्षण, विदेश आणि दळणवळणाशी संबंधित कायदा बनविण्याचा अधिकार होता.

३. इतर कायदे लागू करण्यासाठी त्यांना राज्य सरकारची परवानगी केंद्र सरकारला घेणे अनिवार्य होते.

४. या विशेष अधिकारामुळे राष्ट्रपतींना घटना बरखास्त करण्याचा देखील अधिकार नव्हता.

५. कलम ३७० मुळेच जम्मू आणि काश्मीरवर १९७६ चा शहरी भूमी कायदा लागू होत नव्हता. याचाच अर्थ जम्मू आणि काश्मीरचा रहिवासी नसणारा व्यक्ती जमीन खरेदी करु शकत नव्हता.

६. एवढेच नाही तर ज्या महिलेने इतर राज्यातील मुलाशी लग्न केले असेल तर ते सुध्दा येथे जमीन खरेदी करु शकत नव्हते.

७. याशिवाय देशात आर्थिक आणीबाणी लावण्याची तरतूद आहे ते भारतीय राज्यघटनेचे कलम ३६० देखील जम्मू आणि काश्मीरमध्ये लागू होत नव्हते.

८. भारतातील सर्व राज्यामध्ये लागू होणारे कायदे या राज्यात लागू होऊ शकत नव्हते.

९. जम्मु काश्मिर विधानसभेचा कार्यकाळ ६ वर्षाचा होता. कलम ३७० याव्दारे विशेष तरतुदी करण्यात आलेल्या होत्या.

१०. पाकिस्तान हे २६ ऑक्टोंबर १९४७ रोजी काश्मीरवर हल्ला केल्याने राजा हरिसिंह यांनी भारताला मदत मागीतली व तेंव्हाच शेख अब्दुल्ला यांच्या पुढाकाराने ३७० कलम चा जन्म झाला.

११. भाजपा पक्ष कलम ३७० हटविण्याचा निर्धार पक्षाच्या जाहीरनाम्यातून त्यांनी व्यक्तच केला होता आणि सांसदीय पध्दतीने तो पूर्णत्वास नेला.

३७० कलम म्हणजे जम्मू आणि काश्मीरच्या लोकांना त्यांच्या सोईनुसार त्यांचे हित आणि कायदे निश्चित करण्याचा अधिकार मिळाला होता. तो आता पूर्णत: संपुष्टात आलेला आहे.

सिटिझन या स्वयंसेवी संस्थेने २०१४ मध्येच ३७० या कलमाला आव्हान देणारी याचिका दाखल केली होती. कलम ३६८ अंतर्गत सुधारणाव्दारे ही कलम राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आले नसल्याचे सांगून याचिकाकर्त्यांनी आमच्या मुलांचे नागरिकत्व हिरावल्या गेले असल्याचे त्यांनी कोर्टात सांगीतले होते. ४५अ रद्द झाल्यास जम्मू आणि काश्मीरची स्वायत्तता धोक्यात येईल आणि मुस्लीम बहुसंख्या असलेल्या या राज्यात सामाजिक बदल होतील आणि हिंदु धर्माचे लोंढे येथे येतील. अशी फुटीरवादी नेत्यांचे याचिकेमध्ये म्हणणे होते. ३५अ कलम रद्द होणार या चर्चेमुळे राज्याच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनी भाजपाचे दिवंगत नेते मा. अटलबिहारी वाजपेयी यांची सतत आठवण होत होती. कारण अटलबिहारी वाजपेयी यांना काश्मीरबद्दल मोठी सहानुभूती होती. कारण त्यांनी काश्मीरी लोकांची मने जिंकली होती.

- **३७० हटविण्याच्या निर्णयामुळे होणारे सामाजिक व राजकीय बदल :—**

१. जम्मू आणि काश्मीरला स्वायत्त राज्याचा दर्जा आता राहील नाही व दुहेरी नागरिकत्वाचा विषय सुध्दा संपुष्टात आला.

२. जम्मू आणि काश्मीर बाबत कुठलाही नवा कायदा करण्यासाठी केंद्र सरकारला आता राज्य सरकारची गरज राहणार नाही.

३. राज्य सरकारच्या कायद्यात आता केंद्र सरकार हस्तक्षेप करेल.

४. देशाच्या अन्य राज्यातील नागरीकांना जम्मू आणि काश्मीरमध्ये संपत्ती खरेदी करता येईल.

५. जम्मू आणि काश्मीर मधील पोलीस केंद्र सरकारच्या गृहखात्याच्या अखत्यारितखाली आलेले आहेत.

६. जम्मु काश्मिरचा आता स्वतंत्र झेंडा राहीलेला नाही.

७. एक देश एक संविधान एक झेंडा एक नागरिकत्व

८. राज्यावर आर्थिक आणिबाणी लागू करण्याचा अधिकार आता केंद्र सरकारला मिळालेला आहे.

- **संदर्भ :—**

केंद्र सरकारच्या निर्णयाने व संसरदेच्या दोन्ही सभागृहाने ३७० व ३५अ या विधेयकाला मान्यता प्रदान झाल्यामुळे आता खऱ्या अर्थाने भारतात समता प्रस्थापित झाल्याचे दिसून येते. आता खरी कसोटी केंद्र सरकार जम्मू आणि काश्मीर मधील तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी असणाऱ्या बजेटवरच आता उर्वरीत जम्मू आणि काश्मीरचा विकास अवलंबून असणार आहे. आता नुकतेच अब्बुदला यांनी वक्तव्य करुन आधी जम्मू आणि काश्मीला स्वातंत्र दर्जा मिळवून देवून असे वक्तवे करुन पुन्हा सार्वभौमतवर प्रश्नचिन्ह निर्माण केले.

- **संदर्भ ग्रंथ :—**

१. आंतरराष्ट्रीय संबंध — डॉ. वसंत र. रायपूरकर, श्री. मंगेश प्रकाशन, ५वी आवृत्ती, १९९४

२. भारत का संविधान — डॉ. प्रमोदकुमार अग्रवाल

३. दै. लोकसत्ता

४. दै. नवभारत

५. दै. हितवाद

६. इंटरनेट